**बुच ओ'हेअर**

- सुजित उपाध्ये (त्रिवेणी मराठी शाळा)

मित्रांनो, युद्धाच्या गोष्टी रोमांचक असतात. आज आपण एका शूर वीराची गोष्ट ऐकणार आहोत. दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेच्या वायु-दलात बुच ओ'हेअर नावाचा एक वैमानिक होता. "लेक्सिंगटन" नावाची विमान-वाहू नौका होती. तीवर बुच "वाईल्ड कॅट" नावाचे लढाऊ विमान उडवीत असे. २० फेब्रुवारी १९४२ या दिवशी बुचला आपले शौर्य दाखवायची संधी मिळाली. त्याचे असे झाले - लेक्सिंगटन नौका जपानच्या दिशेनी जात होती. लेक्सिंगटन समुद्रातून जात असताना एका जपानी विमानाने तिला पाहिलेच. त्या विमानाने जपानी ठाण्याला संदेश पाठवला. लेक्सिंगटन वर हल्ला करण्यासाठी आता जपानची लढाऊ विमाने आकाशात झेपावली.

इकडे जपानी ठाण्यावर हल्ला करण्यासाठी लेक्सिंगटन वरून वाईल्ड कॅटनी आकाशात उड्डाण केले होते. त्यातच बुचचे विमान सुद्धा होते. अचानक बुचला आपल्या नौकेकडे जाणारी जपानी विमाने दिसली. आपल्या नौकेला असलेला धोका त्याच्या लक्षात आला. जर ह्या विमानांनी लेक्सिंगटनवर बॉम्ब टाकले, तर ती नक्कीच बुडणार.

बुचच्या बरोबरीची इतर विमाने पुढे गेली होती. तो आता अगदी एकटा होता. पण विचार करायला सुद्धा वेळ नव्हता. एकदम बुचनी निर्णय घेतला. त्याने एकट्याने आठ जपानी विमानांवर हल्ला केला. आठही विमानांकडून येणारी आग चुकवत तो त्यांच्यावर गोळया मारू लागला. आपल्या बंदुकीतून त्याने एका विमानाच्या डाव्या पंखावर गोळया झाडल्या. त्या गोळयांनी त्या विमानाचे इंजिनच तुटून पडले आणि मागोमाग ते विमानही समुद्रात बुडाले. बुचने आता दुसऱ्या विमानावर गोळया झाडायला सुरुवात केली. असे करत त्याने चार विमाने पाण्यात बुडविली. आता मात्र त्याच्याकडच्या गोळयाही संपत आल्या होत्या. मात्र बुच शूर होता. धीर न सोडता त्याने पाचव्या विमानावर हल्ला केला. तेवढ्यात इतर वाईल्ड कॅट तिथे आली आणि त्यांनी जपानी विमानांवर हल्ला चढवला. त्यांनी सर्वच शत्रूच्या विमानांना जलसमाधी दिली आणि ती विमाने दिमाखात लेक्सिंगटन वर येऊन उतरली.

बुचच्या सहकाऱ्यांना त्याच्या शौर्याचे अतिशय कौतुक वाटले. त्याच्यामुळेच आज लेक्सिंगटन आणि तिच्यावरचे सर्वजण वाचले होते. बुचच्या या असामान्य कामगिरीचे कौतुक करण्यासाठी त्याला काँग्रेसचे सन्मान पदक देण्यात आले. हा देशातला सर्वोच्च बहुमान आहे.

शिकागोच्या विमानतळाचे नाव ओ'हेअर आहे हे सर्वांनाच माहिती आहे. पण ते बुच ओ'हेअरची आठवण म्हणून ठेवले आहे हे किती जणांना माहिती आहे?

~~~~~

Unrestricted
~~~~~

**भूतकाळ -** एखाद्या होऊन गेलेल्या गोष्टीबद्दल बोलणे म्हणजे "भूतकाळ." क्रियापदाचा भूतकाळात वापर करताना सहसा शेवटी "ला," "ली" किंवा "ले" येतात. उदाहरणार्थ, झाले, गेला, पडली इ. वरील गोष्टीतील भूतकाळातील ६ क्रियापदे शोधा आणि खाली लिहा. प्रत्येक क्रियापादासाठी स्वतः एक वाक्य करा.

---

---

---

---

---

---

**विशेषण -** नामाबद्दल अधिक माहिती सांगणारा शब्द म्हणजे विशेषण. वरील गोष्टीतील ४ विशेषणे शोधा आणि त्यांचा वाक्यात उपयोग करा.

---

---

---

---

या गोष्टीतील इंग्लिश शब्द शोधून त्यांच्यावर गोल करा.

Unrestricted